# १०
# ''मंडळी'' काय आहे?

भिन्न सांस्कृतिक पार्श्वभूमी व देश असलेल्या एका व्यक्तीला दीर्घकाळासाठी अमेरिका देशात जायचे होते. इंग्रजी शिकण्यासाठी कडी मेहनत घेतल्यावर त्याची खात्री झाली की तो सफर करण्यास तयार आहे. दीर्घ प्रतीक्षेत असलेला अमेरिका प्रवास त्याने केला, अमेरिकेत आगमन झाल्यावर काही वेळातच त्याला त्याच्या इंग्रजीविषयक ज्ञानासंबंधी परीक्षेला सामोरे जावं लागलं. काही वस्तू घेण्यासाठी तो किराणा मालाच्या दुकानांत शिरला, खरेदीनंतर कॅश काऊंटरवर बसलेल्या व्यक्तीने नम्र स्वरात त्याला म्हटले, ''परत या.'' हे ऐकून ही पाहुणा व्यक्ती थांबली, मागे फिरली व परत काऊंटरजवळ गेली. काऊंटरवरच्या व्यक्तीने त्याला विचारले, ''मी तुमची काय मदत करू?'' पाहुणी व्यक्ति काहीशी गोंधळून म्हणाली, ''तुम्ही मला परत यायला सांगितले ना.''

''तुम्ही केलेल्या व्यवहारासाठी आम्ही आभारी आहोत, तुमची सेवा करण्याची संधी परत येऊ द्या,'' असे काऊंटरवर बसलेल्या व्यक्तीला म्हणायचे होते. परंतु त्याच्या वाक्याचा शब्दश: अर्थ पाहुण्या व्यक्तीने लावला. त्यामुळे संवादात गोंधळ निर्माण झाला.

आपल्यापैकी प्रत्येकालाच असा अनुभव आला असेल. बोलणाऱ्यांचे शब्द आपल्याला माहिती होते. परंतु कोणत्या अर्थाने त्याने ते आपल्यासोबत वापरले हे आपल्याला कळले नाही. शब्द कळले परंतु त्यामागील द्यावयाचा संदेश पूर्णपणे चुकला.

अशा परिस्थितीत संवाद होणे अवघड आहे. संवाद घडण्यासाठी ऐकणारा व बोलणारा दोघांनाही खूप दक्ष असणे आवश्यक आहे.

संवादाच्या प्रक्रियेचा संबंध आपण पवित्र शास्त्र (बायबल) अभ्यासाशी जोडू या. पवित्र शास्त्र व आम्हांमध्ये फलद्रूप संवाद घडून येण्यासाठी फक्त पवित्र शास्त्रात वापरलेल्या शब्दांकडेच लक्ष ठेवून चालणार नाही तर पवित्र आत्म्याने प्रेरित लेखकांनी

ते लिहिताना ज्या अर्थाने शब्दांची निवड केली त्या अर्थाकडेही लक्ष केंद्रीत केले पाहिजे. याचा अर्थ असा की ज्या संदर्भान्वये शब्द आणि वाक्यरचना केली गेली तो संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न आम्ही केला पाहिजे. देवाप्रति प्रामाणिक असणे आपल्याकडून ही अपेक्षा करते की देवाचा त्याच्या संदेशामागे काय हेतू होता याचा काळजीपूर्वक शोध आपण घ्यावा.

''मंडळी'' हा शब्द आपल्यापैकी बऱ्याच जणांना परिचित आहे. पवित्र शास्त्रात या शब्दाबद्दल विस्तृतपणे देव आपल्याशी बोलतो. या शब्दाबद्दल देव आणि आम्हांमध्ये अर्थपूर्ण संवाद होण्यासाठी, येशू, प्रेषित आणि आत्म्याने प्रेरित माणसे ज्यांनी देवाच्या आत्म्याद्वारा बायबलचे लेखन केले. त्यांना अपेक्षित असलेले अर्थ, त्यांनी दिलेले दाखले आणि त्यांच्या विचारांचे स्वरूप जाणून घेण्यासाठी बायबलच्या जगात जाण्यास आम्ही इच्छुक असले पाहिजे.

''मंडळी'' म्हणजे काय? नवीन करारातील २७ पुस्तकांपैकी[१] १७ पुस्तकांमध्ये वेगवेगळ्या संदर्भात ''मंडळी'' हा शब्द ११४ वेळा[२] वापरण्यात आला आहे; यातून आपल्याला नेमके काय सुचवले गेले आहे? येशूने जेव्हा मंडळीची स्थापना केली, त्याने कशाची उभारणी केली?

## आध्यात्मिक शरीर

आम्ही सर्वप्रथम हे ओळखावे की ''मंडळी'' ही ख्रिस्ताचे आध्यात्मिक शरीर आहे, ती ख्रिस्ताचे प्रत्यक्ष आध्यात्मिक देह आहे.

''मंडळी'' म्हटली की बहुधा आपल्यासमोर भौतिक इमारतीचे चित्र उभे राहते ज्या ठिकाणी भक्ती होते. नवीन करारात मात्र हा शब्द या अर्थाने कधीही वापरला गेला नाही.

पवित्र शास्त्रात ''मंडळी'' हा शब्द ज्यांनी ख्रिस्ताच्या शुभवर्तमानावर विश्वास ठेविला आणि ज्यांची ख्रिस्ताच्या रक्ताने एकत्र, स्थानिय आणि वैश्विक संवेदनांत सुटका (मुक्ति) झाली आहे.

---

[१]''मंडळी'' शब्दाचा प्रयोग मार्क, लुक, योहान, २ तिमथ्थी, तीताला पत्र, १ आणि २ पेत्र, १ आणि २ योहान कींवा यहुदाला पत्र यामध्ये केल्या गेला नाही.

[२]इथलबर्ट थ. बलिंगर, *ए क्रिटिकल लेक्सिकॉन ॲन्ड कंकॉर्डसन्स टू द इग्लिस ॲन्ड ग्रीक न्यू टेस्टामेन्ट* (ग्रॅड रॅपिडस्, मिश.: झोन्डरवन, १९७५), १५३.

प्रथम, सुटका झालेल्यांचा समूह देवाची भक्ती करण्यासाठी एकत्र जमतो त्याला ''मंडळी'' म्हटले आहे. पौल करिंथ येथील ख्रिस्तीजनांच्या समूहाला त्यांच्यामध्ये असलेल्या फुटीबद्दल दटावतांना ''मंडळी'' हा शब्द वापरतो. तो म्हणतो, ''तुम्ही मंडळी या नात्याने एकत्र जमता तेव्हा तुम्हांत फुटी असतात;...'' (१ करिंथ ११:१८).

दुसरे, ''मंडळी'' या शब्दाचा संदर्भ पवित्र केलेल्या व पवित्रजन होण्यास बोलाविलेल्या विशिष्ट स्थानिय लोकांबद्दल वापरला आहे. ''करिंथ येथील देवाच्या मंडळीस'' (१ करिंथ १:१).

याही पुढे, ''मंडळी'' हा शब्द जगभरातील पवित्र केलेल्या सर्व लोकांसंदर्भात वापरला आहे. पौल मंडळीचा संदर्भ वैश्विक रूपाने देतो, जेव्हा तो म्हणतो, ''कारण जसा ख्रिस्त मंडळीचे मस्तक आहे, तसा पति पत्नीचे मस्तक आहे. शिवाय ख्रिस्त हाच शरीराचा तारणारा आहे'' (इफिस ५:२३).

नवीन करारातील ''मंडळी'' या शब्दाचे उपयोग प्रेषितांची कृत्यांमधील विशिष्ट घटनांना लागू करू या. यरुशलेमेत पेन्टेकॉस्टच्या (प्रे.कृ.२:१-४) दिवशी एकत्र जमलेल्या सर्वांनी पवित्र आत्म्याच्या वर्षावाची बाह्य चिन्हे स्वत: ऐकली व पाहिली. जनसमुदायासमोरील आपल्या भाषणांत पेत्राने लोकांची खात्री करवून दिली की येशू प्रभू आणि ख्रिस्त असे दोन्हीही होता (प्रे. कृ.२:३६). हे ऐकून त्यांच्या अंत:करणास चुटपुट लागली (प्रे.कृ.२:३७) ते म्हणाले, ''आम्ही काय करावे?'' त्यांच्या अंत:करणाची चुटपुट ही विश्वासामुळे असल्याने ''विश्वास ठेवा'' असे पेत्राने त्यांना सांगण्याची गरज भासली नाही, परंतु, त्यांनी जे केले नव्हते फस्त-करणे पापक्षमेसाठी पश्चात्ताप आणि बाप्तिस्मा यांविषयी त्याने त्यांना सांगितले (प्रे. कृ.२:३८). तीन हजार लोकांनी तारणाच्या मार्गाच्या आनंदाने स्वीकार केला. पापक्षमेसाठी त्यांनी पश्चात्ताप करून बाप्तिस्मा घेतला (प्रे. कृ.२:३८,४१).

त्यादिवशी काय घडले याचे वर्णन लूक कशा प्रकारे करतो हे ध्यानात घ्या. प्रथम, बदल झालेल्या लोकांमध्ये नेमका काय बदल झाला याचे वर्णन त्याने केला (प्रे. कृ.२:४१). ज्यांनी प्रभूच्या वचनांचा स्वीकार केला त्यांचे रूपांतर प्रभूच्या मंडळीत झाले. ते सहभागितेचा एक भाग बनलेत. एक समूह म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. दुसरे, परमेश्वराप्रति त्यांच्या वर्तणुकीत त्यांना नवीन जीवन प्राप्त झाले (प्रे. कृ.२:४२).

पवित्र केलेले हे लोक देवाची स्तुती करण्यात व प्रेषितांपासून मिळालेल्या ईश्वरी शिक्षणात तत्पर असत. त्यांच्या एकमेकांप्रति वर्तणुकीतून त्यांच्यातील नवीन जीवन

परावर्तीत होत होते (प्रे. कृ.२:४४,४५). एकमेकांची सुखदु:खे वाहून, गरजवंतांना मदत करून ते एकमेकांची काळजी घेत असतात. विश्वासणाऱ्यांच्या या समूहानंतर प्रेषितांच्या कृत्यांमध्ये ''मंडळी'' म्हणून उल्लेख केला आहे (प्रे. कृ.५:११).

पवित्र केलेले हे लोक जेव्हा यरुशलेमेत परमेश्वराची भक्ती करण्यासाठी एकत्र आले तेव्हा ते ''मंडळी'' म्हणून आले. (एकत्र या अर्थाने) यरुशलेमेंतील पवित्र केलेल्या लोकांना ''यरुशलेमेतील मंडळी'' म्हणून संबोधण्या येई (स्थानिक या अर्थाने) जसजशी मंडळी वाढत गेली आणि पसरत गेली, जगभरांतील सर्व पवित्र केलेल्या लोकांबद्दल असे संबोधता येईल की ''जेव्हा येशू पुन्हा येईल, तेव्हा तो आपल्या मंडळीला (वैश्विक अर्थाने) स्वर्गात घेऊन जाईल.''

## सजीव रचना

दुसरी बाब, आपण मंडळीकडे एक सजीव रचना म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे, काहींच्या मते तारणप्राप्ती झालेल्यांचा समूह ''मंडळी'' ही एक संघटना आहे, एक प्रकारची मानवी संस्था आहे. सभासद होण्यासाठीची एक संस्था एवढाच मर्यादित अर्थ ते काढतात.

पवित्र केलेल्या लोकांचा एक समूह म्हणून मंडळी ही एक सजीव रचना आहे, मानवी संघटना नव्हे. ख्रिस्ताने स्थापन केलेली मंडळी ही देवाकडून येणारं जीवन आणि आशीर्वाद यांमुळे सजीव आणि कंपनात्मक आहे. तो मानवनिर्मित समूह नाही जो फक्त मानवी बुद्धीने, योजनांनी आणि कृतींनी उत्तेजित होतो.

पौलाने करिंथ येथील मंडळीचे वर्णन देवाचे मंदिर, पवित्र स्थान किंवा देवाच्या वास्तव्याचे स्थान असे केले. ''तुम्ही देवाचे मंदिर आहां, आणि तुम्हांमध्ये देवाचा आत्मा वांस करितों हे तुम्हांस ठाऊक नाही काय?''१ करिंथ.३:१६[3] नंतर १ करिंथ.६:१९,२० मध्ये. जारकर्म हे व्यक्तीच्या शरीराबाबतचे पाप आहे, त्याला दोष देताना पौलाने प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला देवाचे मंदिर म्हणून चित्रित केले आहे. १ करिंथ.३:१६ हे वैयक्तिक ख्रिस्ती व्यक्तीला उद्देशून नसून ते मंडळीला उद्देशून लिहिले आहे. पौल हे ठासून सांगत होता की देव त्याच्या लोकांमध्ये वास्तव्य करतो.

---

[3]ग्रीक भाषेमध्ये ''मन्दिर'' यासाठी दोन शब्द आहेत: नाओस (पेरी) आणि हिरोन (हशळीप). या उताऱ्यात पौलाच्याद्वारे ''मन्दिर'' यासाठी उपयोग केलेला शब्द नाओस आहे, हिरोन नाही.

तो त्याच्या लोकांमध्ये व्यक्तिश: (१ करिंथ.६:१९,२०) आणि सामूहिकरित्या १ करिंथ.३:१६ असे दोन्ही प्रकारे वास करितो.[४] जुन्या करारात इस्त्रायल लोकांच्या भटकंतीत देवाचे वास्तव्य निवासमंडपात आणि नंतर यरुशलेमेंतील मंदिरात होते. परंतु ख्रिस्ती युगात पौलाच्या म्हणण्यानुसार देवाचे निवासस्थान त्याची मंडळी, त्याचे लोक आहेत.

मंडळीला सजीव इमारत असे संबोधता येईल. ते काय झाले आहेत हे इफिस येथील ख्रिस्तीजनांना स्पष्ट करताना पौल म्हणतो. तुम्ही एक प्रकारची इमारत आहां जी ख्रिस्तीजनांनी मिळून तयार होते. आणि सतत वाढत जाते. ''त्याच्यामध्ये संबंध इमारत जोडून रचली जात असतां प्रभूच्या ठायी वाढत वाढत पवित्र मंदिर होते, प्रभूच्या ठायी तुम्हीही आत्म्याद्वारे देवाच्या वस्तीसाठी एकत्र रचले जात आहां'' (इफिस. २:२१,२२). ज्या इमारतीचे वर्णन त्याने केले ती प्रेषित आणि संदेष्टे या पायावर उभी असून ख्रिस्त स्वत: तिची मुख्य कोनशिला आहे. इमारतीची रचना ख्रिस्तीजनांमुळे झाली आहे. या इमारतीला छप्पर किंवा छत नसून ती लोकांच्या शुभवर्तमानावरील विश्वासाने मंडळीत मिळविल्याने सतत वर वाढत जाणारी आहे.

म्हणून, मंडळी ही संघटना किंवा संस्था नसून ती देवाचा आत्मा वास करीत असलेली सजीव रचना आहे. देवाच्या जीवनाने सजीव आणि देवाच्या आत्म्याचे निवासस्थान असलेल्या ख्रिस्तीजनांचे ते शरीर आहे. तुम्ही असे म्हणू शकता की ''मंडळी'' हे देवाचे पृथ्वीवरील निवासस्थान आहे.

## समीप नातेसंबंध

तिसरी बाब, मंडळी म्हणजे ख्रिस्तासोबत असलेले समीप नातेसंबंध असा विचार झाला पाहिजे.

जगिक दृष्टीने, एखाद्या मंडळीचे सभासदत्व घेणे म्हणजेच मंडळी ज्या लोकांनी मिळून तयार झाली आहे अशा लोकांसोबत विशेष नातेसंबंधात प्रवेश करणे, असा अर्थ काढणे फारच सहज सोपे आहे. तथापि, अशा प्रकारचा दृष्टीकोन एक महत्त्वाच्या सत्याला मुकतो. मंडळीकडून अपेक्षा आहे ती अत्यंत महत्त्वाचे, समीप आणि सतत कार्यरत नातेसंबंधांची जो येशूसोबतच्या नातेसंबंधांच्या केंद्रस्थानी असेल.

---

[४]या वाक्यामध्ये ग्रीक शास्त्रात ''तुम्ही'' मध्यम पुरुष अनेकवचन आहे, हा संकेत देतांना की लोकांचा एक गट लक्षात आहे, असे नाही की १ करिथ ६:१९,२० च्या प्रमाणे केवळ एक व्यक्ती.

मंडळीचा येशूबरोबरचा सततचा नातेसंबंध इतका निकटचा आहे की त्याचे वर्णन शरीर आणि मस्तक यांच्या नात्याशी केला आहे. ख्रिस्तीजन हे शरीर आहेत तर येशू त्यांचा मस्तक. देवाने मंडळीला ख्रिस्ताचे आत्मिक शरीर असे केले आहे, ती आज या जगात अदृश्य ख्रिस्ताचा दृश्य भाग आहे. या पृथ्वीवर असताना त्याला आपल्या मुक्तिचे कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी ज्या निश्चितपणे भौतिक शरीराची आवश्यकता होती, त्याच निश्चितपणे त्याला आत्मिक शरीराची आवश्यकता आहे यासाठी की त्याची मुक्तिकार्याची फळे सर्वांसाठी आणि सर्वत्र उपलब्ध व्हावी. याच कारणासाठी येशूचे मृतांमधून पुनरुत्थानाच्या पन्नास दिवसानंतर पेन्टेकॉस्टच्या दिवशी पवित्र आत्मा मंडळी – जे ख्रिस्ताचे आत्मिक शरीर आहे तिची रचना करण्यासाठी स्वर्गातून खाली उतरला. त्या दिवसापासून आजपर्यंत पवित्र केलेली प्रत्येक व्यक्ति त्याच्या पवित्रीकरणाच्या समयी देवाच्या अद्‌भुत कृपेमुळे त्या आत्मिक शरीरात जोडली जात आहे.

अशाप्रकारे, नवीन करारातील मंडळीला आत्म्याने प्रेरित लेखकांनी सामाईकपणे ख्रिस्ताचे शरीर असे म्हटले आहे (इफिस.१:२१–२३; ५:२३). ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाचे करणारे त्याचे आत्मिक शरीर होऊन या जगात प्रत्यक्ष त्याप्रमाणे आचरण करतात. ख्रिस्त जो स्वत: मस्तक आहे त्यांना मार्ग दाखवितो. एखाद्याला बाप्तिस्मा मिळाला, नवीन करार स्पष्ट सांगतो की ‘‘ख्रिस्तामध्ये’’ त्याला बाप्तिस्मा मिळाला आहे (रोम. ६:३; गलती.३:२७). किंवा एक शरीर होण्यासाठी बाााप्तिस्मा मिळाला आहे (१ करिंथ.१२:१३). आणि हे अगदी सत्य आहे.

मंडळीचा येशूसी निकटचा नातेसंबंध आहे. ज्यामध्ये व्यक्ती या जगात असताना प्रवेश करू शकतो. मंडळी ख्रिस्ताचे पूर्णत्व आहे, कारण हीच त्याचे शरीर, जो सर्वांनी सर्व काही भरतो त्याने ती भरलेली आहे (इफिस १:२३). ख्रिस्त मंडळीचा पूर्णत्व आहे, कारण त्याच्यामध्ये त्याचे लोक पूर्ण केलेले आहेत (कलस्सै २:१०). ख्रिस्त जो मंडळीचे मस्तक आहे त्याच्याविना मंडळी अपूर्ण आहे(इफिस १:२२). त्याचे शरीर तिच्याविना अपूर्ण आहे (कलस्सै १:१८). मंडळीचे मस्तक जो आहे व त्याचे जे काही आहे ते सर्व तिच्यपा मंडळीचे आहे, असेच मंडळीचेही तिच्या मस्तकाप्रति असावे. म्हणूनच मंडळी या नात्याने ख्रिस्तीजन प्रतिदिनी येशूबरोबर त्याच्या भागीदारीचा अखंड अनुभव घेतात. ख्रिस्तामध्ये असणारे ख्रिस्तीत्वाचे फक्त आव आणणारे नसून प्रत्यक्ष मालक आहेत. त्याच्या शरीरात असणाऱ्यांसाठी ख्रिस्ताच्या पूर्णत्वाचा झरा सतत वाहत असतो.

इफिस करास पत्र अध्याय ५ मध्ये पौलाने मंडळीविषयक चर्चा केली आहे.

मंडळीच्या ख्रिस्ताबरोबरच्या नातेसंबंधांची तुलना पति – पत्नीच्या नातेसंबंधांशी केली आहे, पति ख्रिस्ताला दर्शवितो तर पत्नी मंडळीचे दर्शक आहे. हे नातेसंबंध त्याने प्रथम (तात्त्विक रूपाने) मांडले, जसा पतिपत्नीचे मस्तक आहे तसा ख्रिस्तही मंडळीचे मस्तक आहे (इफिस ५:२३). पुढे हे नातेसंबंध व्यावहारिक रूपाने मांडले, जशी पत्नी पतिच्या अधीन असते, तसे मंडळीनेही सर्व गोष्टीत ख्रिस्ताच्या अधीन असावें (इफिस.५:२४). शेवटी, पौलाने हे नातेसंबंध उद्देश रूपाने चर्चिले आहेत, जशी पतीने आपल्या पत्नीवर प्रीती केली पाहिजे तशी ख्रिस्त आपल्या मंडळीवर प्रीती करतो आणि त्यावर विश्वासणाऱ्यांच्या या मंडळीला त्याच्यासोबत अनंत काळ राहण्यासाठी तयार करीत आहे (इफिस. ५:२५–२७).

नवीन करारातील मंडळी तिच्या केंद्रस्थानी ख्रिस्तासोबतचे नातेसंबंध आहे. सुरूवातीला लोकांसोबत नसलेले नातेसंबंध त्वरित इतर ख्रिस्तीजनांसोबतच्या नातेसंबंधात रूपांतरित होतात. मंडळीच्या इतर सदस्यांसोबत नाते जुळतात जणू एकाच पित्याचे त्याच्या लेकरांशी नाते असावे तसे. ख्रिस्ताच्या शरीराचे सभासद हे एकमेकांचेही सभासद असतात, परंतु प्रथम आणि सर्वात महत्त्वाचे – मंडळी ही ख्रिस्ताचे शरीर आहे. ख्रिस्ताच्या मंडळीचे सदस्य होण्यासाठी आपण ख्रिस्तासोबत नातेसंबंध प्रस्थापित केले पाहिजेत, हे नातेसंबंध इतके समीप व विशेष असावे की जणू आम्ही त्याचाच एक भाग आहोत, जसे शरीर मस्तकाचे असते.

## सारांश

‘‘मंडळी’’ या शब्दाच्या नेमक्या अर्थावरून अनेक गोंधळात आहे. असा गोंधळ अस्तित्वात असू नये, कारण बायबलमध्ये त्याचा अर्थ अगदी स्पष्ट केला आहे.

‘‘मंडळी’’ म्हणजे काय? ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाचे आज्ञापालन केल्याने त्याची प्रजा झाली आहेत, समाजात त्याच्या प्रजेप्रमाणे त्याची भक्ती व कार्य करतात, अशा लोकांमिळून तयार झालेले एक आत्मिक शरीर म्हणजे मंडळी होय. ते त्याचे नाव परिधान करतात व पृथ्वीवरील त्याचे आत्मिक शरीर आहे. त्यांच्या सर्व कार्यात ख्रिस्ताचे गौरव करतात. हे आत्मिक शरीर एक सजीव रचना आहे ज्यामध्ये जिवंत देवाचा आत्मा वास करतो. मंडळीचा एक भाग असणे म्हणजे एखाद्या मानवी संघटनेत सहभागी होणे किंवा समूहाचा सदस्य होणे एवढा संकुचित अर्थ नाही. तर ख्रिस्तासोबत समीप आणि सतत नातेसंबंध असणे हा अर्थ अभिप्रेत आहे.

मंडळी जे ख्रिस्ताचे शरीर आहे, तीत विश्वासाने प्रवेश मिळतो. या विश्वासाच्या

प्रतिसादांत पश्चाताप (प्रे. कृ.१७:३०,३१), येशू हा देवाचा पुत्र आहे अशी कबुली (रोम.१०:१०), ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा (रोम.६:३; गलती.३:२७) या गोष्टी अंतर्भूत आहेत. बाप्तिस्मा घेतल्याने व्यक्तिचे सर्व पाप धुतले जाऊन त्याचा एक प्रकारे नवीन जन्म होतो, आणि तो ख्रिस्ताच्या मंडळीचा एक भाग बनतो (प्रे. कृ.२:३८,४१,४७; २२:१६; १ करिंथ.१२:१३).

नवीन करारातील मंडळी ही एखादा पंथ नाही. पंथ हे मानवनिर्मित आहेत; याउलट ती देवाने आखलेली, निर्मिलेली, वास केलेली आहे; आणि तो स्वत: तिला राखतो. पंथ हे पृथ्वीवरील मानवाकडून येतात; नवीन करारातील मंडळी ही स्वर्गातून, देवाकडून अस्तित्वात येते. मंडळी ही ख्रिस्ताची आहे, ती त्याचे नाव परिधान करते, त्याच्या भक्तीसाठी एकत्र जमते, जगात त्याचे कार्य करते, आणि तीत त्याच्या आत्म्याचे वास्तव्य असते (पाठ क्र.१३ वर ''नवीन करारातील मंडळी'' या शीर्षकाचा तक्ता पहा.).

त्याच्या मंडळीत प्रवेश करण्यासाठी ख्रिस्ताकडून सर्व लोकांसाठी खुले आमंत्रण आहे. त्याची तारणाची (प्रकटी.२२:१७) व जगात त्याची मंडळी म्हणून जगण्याची पूर्वअट त्याने ठेवली आहे.

## अभ्यासासाठी प्रश्न

*(उत्तरे पृष्ठ 235 वर आहेत)*

१. पवित्र शास्त्रातील शब्द, जसे ''मंडळी'' हा शब्द पवित्र आत्मा कशा प्रकारे उपयोगात आणत आहे, हे समजणे आपल्यासाठी किती गरजेचे आहे?

२. नवीन करारात ज्या भिन्न प्रकारे ''मंडळी'' हा शब्द वापरात आला आहे, त्यावर चर्चा करा.

३. मंडळी देवाचे मंदिर आहे, याचा आपल्या आजच्या ख्रिस्ती जीवनात काय अर्थ आहे? मंडळीला दिलेले हे नाव मंडळीच्या सदस्यांनी कसे राहावे, कार्य करावे, आणि कशी भक्ती करावी याचे सूचक आहे काय?

४. मंडळी कोणत्या अर्थाने ''सजीव'' इमारत आहे?

५. पति-पत्नीचे नातेसंबंध हे ख्रिस्त व मंडळीचे नातेसंबंध चित्रित करू शकते. कसे?

६. एखादी व्यक्ती ख्रिस्ताच्या मंडळीत कशी काय प्रवेश करते? सुस्पष्ट करा.

७. कोणत्या अर्थाने मंडळी अद्वितीयपणे ख्रिस्ताची आहे?

## शब्दार्थ

**पंथ** - विशिष्ट नाव धारण केलेला (जे बायबलमध्ये सापडत नाही) धार्मिक विचारसरणीचा समूह, विशिष्ट विश्वासाखाली एकत्र येतात, आणि सल्लागार मंडळाद्वारा नियंत्रित असतात. बायबलमध्ये कोणत्याही पंथाचा उल्लेख नसल्याने हा शब्द बायबलमधून आलेला नाही.

**सहभागिता** - ख्रिस्तीजनांची एकमेकांसाठी प्रीतीने भरलेली अंत:करणे, आवडीनिवडी, आदर्श किंवा अनुभव एक दुसऱ्यांसोबत वाटणे.

**जारकर्म** - लैंगिक पाप. विवाह न करताही लैंगिक संबंध ठेवणे.